# अर्थशास्त्र

## बी.ए. प्रथम वर्ष (सेमिस्टर II)

- डॉ. प्रज्ञा बागडे

## पेढी व उद्योगाचे संतुलन

## (Equlibrium of Firm and Industry)

विशिष्ट वस्तुंचे उत्पादन करणारी कोणतीही संस्था म्हणजे पेढी किंवा उद्योगसंस्था होय. अर्थशास्त्राच्या अभ्यासामध्ये पेढी किंवा उद्योगसंस्था आधार मानून मूल्य निश्‍चितीचा विचार केला जातो. ज्या किंमतीला वस्तूची मागणी व पुरवठा समान होतात ती संतुलन अवस्था होय. अशी संतुलन अवस्था गाठल्यानंतर पुरवठ्यामध्ये किंवा मागणीमध्ये बदल करणे उत्पादकाला किंवा उपभोक्त्याला लाभदायक ठरत नाही. पेढीचे संतुलन म्हणजे उत्पादनाची अशी स्थिती की ज्या स्थितीत पेढीला बदल करण्याची तयारी नसते. या स्थितीत पेढीला महत्तम लाभ होत असतो. त्यामुळे या स्थितीत पेढी आपल्या उत्पादनाच्या परिमाणात बदल करण्यास तयार नसते. म्हणुन संतुलन म्हणजे बदलाचा अभाव अशी स्थिती होय.

### पेढी

### (Firm)

उत्पादन संस्थेला पेढी असे म्हणतात. या उत्पादन संस्थेला उत्पादनाची साधने एकत्र करुन त्यांचा वापर अधिकाधिक उत्पादनासाठी करावा लागतो. उत्पादनाचे विविध घटक एकत्र आणून त्यामध्ये योग्य समन्वय घडवून आणावा लागतो. उत्पादन संस्थेला आपली उद्दिष्ट्ये,

निर्धारीत करावी लागतात. वेळोवेळी योग्य ते निर्णय घ्यावे लागतात. तसेच अमंलबजावणीसाठी नियोजन, निरिक्षण, नियंत्रण यासारखी कार्ये करावी लागतात.

## व्याख्या

## (Definition)

**लिप्से यांच्या मते,** ''वस्तू किंवा सेवांचे उत्पादन व विक्री करणारी संस्था म्हणजे उत्पादन संस्था होय.''

**प्रा. वाटसन यांच्या मते,** ''पेढी असे एकक आहे की, जे नफा मिळविण्याच्या दृष्टीने विक्रीसाठी उत्पादन करते आणि महत्तम विक्री करुन नफा प्राप्त करणे हाच तिचा उद्देश असतो.''

## पेढीची वैशिष्ट्ये

## (Features of Firm)

पेढीची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे सांगता येतील.

१) उत्पादनाची सर्व प्रकारची धोरणे ठरविणे.

२) उत्पादनाची विभिन्न बाजारात विक्री करणे.

३) उत्पादनासाठी आवश्यक साधनांची जुळवाजुळव करणे.

४) उत्पादन प्रक्रिया यशस्वी होण्याकरीता वेळोवेळी योग्य ते निर्णय घेणे.

५) उत्पादनाचे ठिकाण, परिमाण या संबंधी निर्णय घेणे.

६) उद्योगसंस्था नफ्याच्या हेतूने प्रेरित होवून कार्य करीत असते.

## पेढीचे संतुलनाची व्याख्या

## (Definition Equilibrium of Firm)

**प्रा. हॅन्सन यांच्या मते,** ''ज्यावेळी पेढीला उत्पादनात घट करणे अथवा वाढ करणे लाभदायक नसते त्यावेळी पेढी संतुलनावस्थेत असते.''

## पेढीच्या संतुलनावस्थेची वैशिष्ट्ये

१) संतुलनावस्थेत पेढीला महत्तम नफा प्राप्त होतो.

२) संतुलनावस्थेत पेढीचा उत्पादन खर्च न्यूनतम असतो.

३) संतुलनावस्थेत पेढी उत्पादनाच्या परिणामात व किंमतीत बदल करु इच्छित नाही.

## पेढीच्या संतुलन विश्लेषणाची गृहीत परिस्थिती

पेढीचे संतुलन खालील गृहीतांवर आधारीत आहे.

१) प्रत्येक पेढीचा उद्देश महत्तम नफा प्राप्त करणे हा असतो.

२) महत्तम नफा प्राप्त करण्यासाठी प्रत्येक पेढी आपल्या उत्पादनाचा खर्च कमीत कमी करण्यासाठी प्रयत्नशील असते.

३) पूर्ण स्पर्धेत प्रत्येक पेढी एकाच वस्तूचे उत्पादन करते.

४) प्रत्येक उत्पादन साधनांची किंमत निश्चित असून त्यांचा पुरवठा लवचिक असतो.

५) सर्व उत्पादन साधनांची कार्यक्षमता समान आहे.


## पुर्ण स्पर्धेत पेढीचे अल्पकालीन संतुलन

**(Short-term Equilibrium of Firm under perfect competition)**

पूर्ण स्पर्धेत पेढीचे अल्पकालीन संतुलन पाहण्याअगोदर अल्पकाळ म्हणजे काय ? याचा विचार करणे आवश्यक ठरते. अल्पकाळात पेढ्या केवळ बदलत्या घटकात बदल करुन उत्पादनात वाढ किंवा घट करु शकतात. यंत्रसामुग्री, इमारत यासारख्या स्थिर घटकात बदल करता येत नाही. या काळाला अल्पकाळ असे म्हणतात. अल्पकाळात पेढी तसेच उद्योगाच्या आकारमानात बदल करता येत नाही.

अल्पकाळात पेढीला वस्तूची किंमत ठरवून दिली जाते. कारण पूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीत वस्तूची किंमत उद्योग निश्चित करीत असतो. उद्योगसंस्था किंवा पेढी या दिलेल्या किंमतीवर आपले उत्पादनाचे नियोजन करीत असते. एक पेढी संतुलनावस्थेत तेव्हाच असते जेव्हा त्या पेढीचा सीमांत खर्च हा सीमांत प्राप्ती बरोबर असतो. अल्पकाळात पेढीला अतिरिक्त लाभ, हानी किंवा प्रसामान्य लाभ ही प्राप्त होवू शकतो.

**अ) अतिरिक्त नफ्याची स्थिती**




आकृतीत अक्ष अक्षावर उत्पादन परिमाण व अय अक्षावर प्राप्ती व खर्च दर्शविले आहेत. स.प्रा. व सी. प्रा. हे सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती वक्र आहेत. स.ब.ख हा सरासरी बदलता खर्च वक्र आहे. स.ए.ख. हा सरासरी एकूण खर्च वक्र आहे. आकृतीत सीमांत खर्च वक्र सीमांत प्राप्ती वक्राला क बिंदूत खालच्या बाजूने छेदतो म्हणून अब हे


पेढीचे संतुलीत उत्पादन होय. ह्या उत्पादनाला सी. ख. = सी. प्रा. (ब क) आहे. ह्या उत्पादनाला सरासरी प्राप्ती म्हणजे किंमत ब क आहे. ह्यावरुन पेढीची एकुण प्राप्ती ही किंमत (ब क) गुणीले उत्पादन (अब) एवढी म्हणजे अबकक$_{१}$ चौकोनाएवढी होईल. अब उत्पादनाचा सरासरी खर्च बक$_{३}$ आहे. म्हणून पेढीचा एकूण उत्पादन खर्च हा अब क$_{२}$ क$_{३}$ चौकोनाएवढा होईल. ह्यावरुन पेढीचा एकूण नफा काढता येतो.

एकूण नफा = एकूण प्राप्ती – खर्च

= अ ब क क$_{१}$ - अ ब क$_{२}$ क$_{३}$

= क क$_{१}$ क$_{२}$ क$_{३}$

**ब) तोट्याची स्थिती**



आकृतीत अक्ष अक्षावर उत्पादन परिमाण व अय अक्षावर प्राप्ती व खर्च दर्शविले आहे. स. ए. ख. व सी. ख. हे पेढीचे सरासरी एकुण खर्च वक्र व सीमांत खर्च वक्र आहेत. अल्पकाळ आहे म्हणून स.ब.ख. हा पेढीचा सरासरी बदलता खर्च वक्र आहे. पेढीचे संतुलीत उत्पादन अ, ब आहे. कारण ह्या उत्पादनाला सी. खर्च व सीमांत प्राप्ती (ब क) समान आहे. सरासरी प्राप्ती म्हणजे किंमत वक्र असल्यामुळे पेढीची एकूण प्राप्ती अ,ब,क,क$_{१}$ आहे. अ ब उत्पादनाचा सरासरी खर्च ब क$_{२}$ आहे. म्हणजेच सरासरी प्राप्तीपेक्षा जास्त आहे. त्यामुळे पेढीला प्रत्येक नगावर क क$_{२}$ एवढा तोटा होतो. अ ब उत्पादनाचा एकूण उत्पादन खर्च अ ब क$_{२}$ क$_{३}$ आहे जो एकूण प्राप्ती पेक्षा जास्त आहे.


तोटा एकूण खर्च – एकुण प्राप्ती

अ ब क$_{२}$ क$_{३}$ – अ ब क क$_{१}$

क$_{२}$ क$_{३}$ क क$_{१}$

अल्पकाळात तोटा सहन करावा लागत असला तरी पेढ्या आपले उत्पादन चालू ठेवतील. कारण तोटा येत असला तरी ब क ह्या किंतीतून सरासरी बदलता खर्च पूर्णपणे भरुन निघतो व स्थिर खर्चाच्याही काही भागाची भरपाई होते. परंतु जर किंतीतून सरासरी बदलता खर्च भरुन निघत नसेल तर मात्र पेढीला उत्पादन बंद करणे परवडेल. म्हणून अल्पकाळात सरासरी बदलता खर्च भरुन निघेल एवढी तरी किमान किंमत असावयास हवी.

### क) प्रसामान्य नफ्याची स्थिती




आकृती स. प्रा. व सी. प्रा. सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती वक्र आहेत. स.ब.ख. सरासरी बदलता खर्च वक्र आहे. स. ए. ख. हा सरासरी एकूण खर्च वक्र आहे. सी. ख. हा सीमांत खर्च वक्र आहे. पेढीचे संतुलीत उत्पादन अ ब आहे. कारण ह्या उत्पादनाला सीमांत प्राप्ती व सीमांत खर्च समान आहे. अ ब उत्पादनाची सरासरी प्राप्ती म्हणजे किंमत ब क आहे. म्हणून पेढीची एकूण प्राप्ती अ ब क क$_{१}$ आहे. तसेच पेढीचा उत्पादन खर्च ही अ ब क क$_{१}$ आहे. अ ब उत्पादनाचा सरासरी खर्च हा सरासरी प्राप्ती एकटाच म्हणजे बक आहे. एकूण प्राप्ती व एकूण उत्पादन खर्च हे दोन्ही समान असल्यामुळे पेढीला प्रसामान्य लाभ होतो. ब क ह्या किंतीला पेढीचा सरासरी बदलता खर्च व सरासरी स्थीर खर्च दोन्ही भरुन निघतात.

## पुर्ण स्पर्धेत पेढीचे दीर्घकालीन संतुलन

**(Long – term Equilibrium of Firm under Perfect Competition)**

ज्या काळात उत्पादन बदलण्याच्या दृष्टीने सर्व उत्पादन घटकांच्या नग संख्येत बदल करता येतो त्याला दीर्घकाळ म्हणतात. हा दीर्घकाळ एक वर्षपेक्षा अधिकचा काळ असतो. दीर्घकाळात पेढीला उत्पादनाच्या स्थिर व बदलत्या घटकांमध्ये आवश्यकतेनुसार वाढ किंवा घट करता येते. तसेच उत्पादन तंत्रात, यंत्रसामग्रीत सुध्दा बदल करता येतो. त्यामुळे पेढी उत्पादनाच्या आकारमानातही बदल करु शकते. दीर्घकाळात नवीन पेढ्या उद्योगात प्रवेश करु शकतात किंवा अस्तित्वात असलेल्या पेढ्या उद्योग सोडून बाहेर जाऊ शकतात.

दिर्घकाळात पुरवठा लचचिक असल्याने मागणीनुसार पुरवठ्यात बदल करता येतो. दीर्घकाळात प्रत्येक पेढीला प्रसामान्य नफा मिळतो. म्हणजेच किमान नफा मिळतो. उत्पादनाला उत्पादन सुरु ठेवण्यासाठी आवश्यक असणारा नफा म्हणजे प्रसामान्य नफा होय. दीर्घकाळात कोणत्याही पेढीला अतिरिक्त नफा मिळत नाही. अतिरिक्त नफा मिळाल्यास नवीन पेढ्या नफ्याने आकर्षित होऊन उद्योगात प्रवेश करतील त्यामुळे वस्तूच्या पुरवठ्यात वाढ होऊन किंमती कमी होतात व अतिरिक्त नफा नष्ट होतो.

थोडक्यात, दीर्घकाळात पेढीचा एकूण उत्पादन खर्च आणि एकूण प्राप्ती ह्या दोन्ही बाबी समान असतात तेव्हा पेढीचे संतुलन साधले जाते.


## दीर्घकालीन संतुलनाच्या अटी

दीर्घकालीन संतुलनासाठी पुढी अटी पूर्ण होणे आवश्यक असते.

१) उद्योगातील प्रत्येक पेढी संतुलनावस्थेत असणे.

२) संपूर्ण उद्योग संतुलनावस्थेत असणे.

वस्तुची किंमत किंवा सरासरी प्राप्ती = वस्तूचा सीमांत खर्च ही अट पूर्ण झाल्याशिवाय उत्पादन संस्थेचे किंवा पेढीचे संतुलन साधल्या जात नाही.




आकृतीमध्ये अक्ष अक्षावर उत्पादन परिमाण व अय अक्षावर खर्च व प्राप्ती दर्शविली आहे. दी. स. ख हा दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र आहे तर दी. सी. ख. हा दीर्घकालीन सीमांत खर्च वक्र आहे. स. प्रा. व सी. प्रा. हे सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती वक्र आहेत. सीमांत खर्च, सीमांत प्राप्ती, सरासरी खर्च व सरासरी प्राप्ती ह्या बाबी 'स' ह्या बिंदूमध्ये समान आहे. त्यामुळे 'स' ह्या बिदूंत पेढीचे संतुलन साधले जाते. अ ब हे पेढीचे संतुलीत उत्पादन आहे. सरासरी प्राप्ती व सरासरी खर्च समान असल्यामुळे पेढीला अतिरिक्त नफा किंवा तोटा होत नाही. केवळ प्रसामान्य नफा होतो. ह्या स्थितीत उद्योगात नवीन पेढ्या प्रवेश करणार नाही तसेच वर्तमान पेढ्या उद्योग सोडून जाणार नाही.

## उद्योग

## (Industry)

एकाच प्रकारची वस्तू एकाच बाजारपेठेसाठी उत्पादीत करणाऱ्या उद्योगसंस्थांच्या समुहाला उद्योग म्हणतात. उद्योगात महत्तम नफा हेतू नसून पर्याप्त नफा मिळावा या उद्‌देशाने उत्पादनाचे कार्य केले जाते. उद्योगाचे स्वरुप पेढीच्या तुलनेत मोठे असल्यामुळे भांडवल, प्रगत उत्पादन तंत्र, इतर आधुनिक सुविधा उपलब्ध केली जाते. उद्योगाला देखील आपली उद्दिष्ट्ये पूर्ण करावी लागतात. त्यासाठी नियोजनाद्वारे उत्पादनांची प्रक्रिया पूर्ण होत असते. थोडक्यात, उद्योगात विशिष्ट वस्तू उत्पादीत करणाऱ्या अनेक पेढ्यांचा समावेश असतो.

### व्याख्या

### (Definition)

**रॉबिन्स यांच्या मते,** ''एकाच प्रकारची वस्तू उत्पादीत करणाऱ्या उद्योगसंस्थांचा समुह उद्योग होय.''

## उद्योगाचे संतुलन

ज्या ठिकाणी उद्योगाद्वारे उत्पादीत वस्तूची मागणी व पुरवठा समान होतो. अशा स्थितीला उद्योगाचे संतुलन म्हणतात. एक उद्योग संतुलनावस्थेत तेव्हाच येईल जेव्हा त्या उद्योगामध्ये वस्तूच्या उत्पादनात बदलाची प्रवृत्ती नसते. उद्योगाद्वारे उत्पादीत वस्तूची मागणी व पुरवठा समान होवून त्या वस्तूची अशी एक मात्रा प्राप्त होते की, ज्यावर उद्योगाला कायम राहण्याची प्रवृत्ती असते. या स्थितीला उद्योगाचे संतुलन म्हणतात. जर कोणत्याही प्रचलीत किंमतीवर वस्तूच्या मागणीची मात्रा त्याच्या पुरवठ्याच्या मात्रेपेक्षा अधिक होते तेव्हा उद्योग उत्पादनाच्या मात्रेत वाढ करण्यास प्रेरीत होईल. याउलट पुरवठ्याची मात्रा मागणीच्या अपेक्षेपेक्षा अधिक होते तेव्हा उद्योग आपले उत्पादन घटविण्यास प्रेरीत होईल.

## पूर्ण स्पर्धेत उद्योगाचे अल्पकालीन संतुलन


पूर्ण स्पर्धेच्या बाजारात ज्या किंमतीला एकूण मागणी व एकुण पुरवठा समान होतात तेथे उद्योगाचे संतुलन साधले जाते. उद्योगाचा पुरवठा वक्र हा सर्व उद्योगसंस्थांच्या सीमांत खर्चाच्या वक्रांची बेरीज असते. हा पुरवठा वक्र डावीकडून उजवीकडे वर जाणारा असतो.

पूर्ण स्पर्धेत अल्पकाळातील उद्योगधंदयाच्या मालाची मागणी म्हणजे पूर्ण बाजारपेठेची मागणी असते. अल्पकाळातील मागणी वक्र हा वरुन खाली डावी कडून उजवीकडे सरकणारा असतो.

एकुण मागणी वक्र व एकुण पुरवठा वक्र जेथे समान होतात तेथे वस्तूची किंमत ठरते आणि उद्योगाचे संतुलन साधले जाते.

उद्योगाच्या संतुलनासाठी आवश्यक अटी

१) सर्व पेढ्या प्रसामान्य लाभाच्या स्थितीत आहे २) उद्योगातील प्रत्येक पेढ्यांचा सीमांत खर्च हा सीमांत प्राप्ती बरोबर असेल.




मागणी व पुरवठा

आकृतीमध्ये अक्ष अक्षावर मागणी व पुरवठा दर्शविला असून अय अक्षावर किंमत दर्शविली आहे. प प हा पुरवठा वक्र असुन व मम हा मागणी वक्र आहे. मागणी व पुरवठ्याचे संतुलन 'स' बिंदूत झाले आहे. म्हणून अ क ही संतुलीत किंमत आहे. ह्या किंमतील अ ब हा संतुलीत मागणी व पुरवठा आहे.

## उद्योगाच्या अल्पकालीन संतुलनाची वैशिष्ट्ये

१) संतुलीत किंमतीला मागणी व पुरवठा समान असतो.

२) उद्योगाचे संतुलन होते तेव्हा उद्योगसंस्थांचेही संतुलन साधलेले असते.

३) पेढी संतुलीत किंमत बदलवू शकत नाही. ती ग्राह्या मानावी लागते.

४) पुर्ण स्पर्धेत उद्योगाच्या संतुलनाची क्रिया स्वंयचलीत असते.

५) पूर्ण स्पर्धेत किंमत यंत्रणा मुक्तपणे कार्य करते.

## पुर्ण स्पर्धेत उद्योगाचे दीर्घकालीन संतुलन


**(Long term Equilibrium of the Industry under perfect competition)**

दीर्घकाळात पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत उद्योगाचे संतुलन होण्याकरीता पेढ्यांच्या संख्येत बदल होता कामा नये म्हणजेच त्या उद्योगात नवीन पेढ्यांना प्रवेश करावा असे वाटता कामा नये, तसेच उद्योगात असलेल्या पेढ्यांना बाहेर जावे असे वाटता कामा नये तेव्हाच उद्योगाचे संतुलन साधले जाईल.

## दीर्घकाळात उद्योगाचे संतुलनासाठी आवश्यक अटी

१) सीमांत खर्च = सीमांत प्राप्ती जेणेकरुन कोणाला ही आपले उत्पादन वाढवावे किंवा कमी करावे असे वाटणार नाही.

२) सरासरी खर्च = सरासरी प्राप्ती = किंमत होईल. जेणेकरुन उद्योगात असणाऱ्या पेढ्यांच्या संख्येत वाढ किंवा घट होणार नाही.



आकृतीमध्ये प्रारंभी प प हा पुरवठा वक्र असून मम हा मागणी वक्र सर्व पेढ्यांचा मिळुन तयार झालेला आहे. क ही प्रत्येक पेढीच्या किमान सरासरी खर्चाची पातळी आहे. या परिस्थितीत उद्योगाचे संतुलन ‘स’ ह्या ठिकाणी प्रस्थापित होते. याठिकाणी अ ब एवढा पुरवठा असतो.

दीर्घकाळात मागणी वाढली तर नवीन मागणी वक्र वर सरकतो. नवीन मागणी वक्र म$_{१}$ म$_{१}$ असा होतो. त्यामुळे साहजिकच किंमत वाढते. ती क$_{१}$ पर्यंत वाढते. ही किंमत सरासरी खर्चापेक्षा जास्त असल्याने प्रत्येक पेढीला अतिरिक्त नफा मिळले. त्यामुळे नवीन पेढ्या उद्योगात प्रवेश करतील. पेढ्यांची संख्या वाढल्याने वस्तूचा पुरवठा वाढेल व किंमत ‘क’ पर्यंत कमी होईल.

प$_{१}$ प$_{१}$ हा नवीन पुरवठा वक्र व म$_{१}$ म$_{१}$ मागणी वक्राचे नवीन संतुलन स$_{१}$ ह्या ठिकाणी प्रस्थापित होईल. या स्थितीत एकूण पुरवठा अ ब पासून अ ब$_{१}$ पर्यंत वाढतो. या ठिकाणी किंमत क ही पेढ्यांच्या किमान सरासरी खर्चा एवढी असल्याने अतिरिक्त नफा कोणालाही मिळणार नाही.

समजा दीर्घकाळात मागणी कमी झाली तर नवीन मागणी वक्र म$_{२}$ म$_{२}$ तयार होईल. त्यामुळे वस्तूची किंमत होऊन क$_{२}$ होईल. क$_{२}$ ही किंमत सरासरी खर्चापेक्षा कमी असल्याने प्रत्येक पेढीला तोटा सहन करावा लागतो, त्यामुळे काही पेढ्या या उद्योगातून बाहेर पडतील. त्यामुळे स्वाभाविकच वस्तूचा पुरवठा कमी होऊन किंमती वाढण्यास सुरवात होईल. नवीन संतुलन स$_{२}$ ह्या ठिकाणी साधले जाईल. एकूण पुरवठा अ ब पासून अ ब$_{२}$ पर्यंत कमी होतो. परंतु किंमत ‘क‘ ही सर्व पेढ्यांच्या किमान सरासरी खर्चाएवढी असल्याने कोणत्याही पेढीला तोटा सहन करावा लागत नाही.

## उद्योगाच्या दीर्घकालीन संतुलनाची वैशिष्ट्ये

१) मागणी व पुरवठा समान होतात.

२) प्रत्येक पेढीला दीर्घकाळात प्रसामान्य नफा मिळतो.

३) उद्योगाने प्रस्थापित केलेली किंमत ही सर्व पेढ्यांच्या सरासरीखर्चाएवढी असते.

४) कोणत्याही पेढीला उद्योग सोडवा असे वाटत नाही किंवा कोणतीही नवीन पेढी उद्योगात प्रवेश करीत नाही.

५) या परिस्थितीत सर्वच पेढ्या पर्याप्त आकाराच्या असतात.

## अपेक्षित प्रश्न

### दीर्घोत्तरी प्रश्न

१) पूर्ण स्पर्धेत पेढीचे अल्पकालीन संतुलन कसे साधले जाते ते आकृतीच्या स्पष्ट करा.

२) पूर्ण स्पर्धेत पेढीचे दीर्घकालीन संतुलन स्पष्ट करा.

### लघुत्तरी प्रश्न

१) पूर्ण स्पर्धेची वैशिष्ट्ये सांगा.

२) पेढीचे संतुलन म्हणजे काय?

३) पूर्ण स्पर्धेतील उद्योगाचे संतुलन स्पष्ट करा.

४) पेढी व उद्योगाची व्याख्या द्या.

५) पेढीची वैशिष्ट्ये विशद करा.

६) उद्योगाच्या दीर्घकालीन संतुलनाची वैशिष्ट्ये सांगा.